# नियमित दिवाणी मुकदमा क्र.८८/२०२० मधील निशाणी क्र.३५ वर आदेश

**CNRNO.MHLA110000812020**

०१. सदर अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. तसेच पक्षकारांतर्फे विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. तसेच प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले.

०३. सदर प्रकरणातील कागदपत्रांच्या अवलोकनावरुन स्पष्ट होते की, सदर प्रतिवादी यांनी प्रकरणात हजर होवून देखील मुदतीमध्ये कैफियत व म्हणणे दाखल केलेले नाही. कोरोना संसर्ग, दुष्काळ, अतिवृष्टी, निवडणूक प्रक्रिया व लॉकडाउनचे नियम पाळण्याकरीता कार्यवाही करावयाचे असल्यामुळे व लोकहिताचे कामे असल्यामुळे प्रतिवादींना मुदतीमध्ये जबाबदावा व म्हणणे दाखल करता आले नाही असे अर्जामध्ये प्रतिवादींनी कथन केलेले आहे. तसेच मार्च २०२० पासून कोव्हीड–१९ या संसर्गजन्य आजारामुळे न्यायालयीन कामकाजावर देखील परीणाम झालेले होते. त्यादरम्यानच्या न्यायालयीन कामकाजाबाबत मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयाकडून वेळोवेळी दिशानिर्देश प्राप्त झालेले होते. त्यामुळे अर्जात नमूद केलेले कारण, पक्षकारांमधील वादाचे स्वरुप व कोव्हीड–१९ या संसर्गजन्य आजारामुळे उत्पन्न झालेली परिस्थिती विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, पक्षकारांमधील वादाचे कायमस्वरुपी निराकरण होण्याकरीता प्रतिवादींना बचाव मांडण्यास संधी देणे न्यायोचीत होणार आहे. त्यामुळे अर्जात नमूद कारण, पक्षकारांमधील वादाचे स्वरुप व नैसर्गिक न्यायाचे तत्व विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब मी शेवटी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

नि.क्र.३५ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

Digitally signed by Shivakant Machhindra Gourgond
Date: 2021.03.23 17:51:37 +0530

दि.२३.०३.२०२१

(शि. म. गौरगोंड)
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, निलंगा.